follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २३६ ✻ सातारा, शनिवार दि.१८ मे २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

‘मी तुम्हाला विकसित भारत देऊन जाईन, ही माझी गॅरंटी’

शिवतीर्थावर नरेंद्र मोदींचं मोठं विधान

राजदंड न्यूज नेटवर्क : लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. येथील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा आज शिवाजी पार्क येथे झाली. यावेळी नरेंद्र मोदी यांनी मी तुम्हाला विकसित भारत देऊन जाईन, ही माझी गॅरंटी आहे, असं सूचक विधान करत विकसित भारताचा रोडमॅप मतदारांसमोर मांडला. 'मी तुम्हाला विकसित भारत देऊन जाईन, ही माझी गॅरंटी', शिवतीर्थावर नरेंद्र मोदींचं मोठं विधान लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. येथील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधाननरेंद्र मोदी यांची सभा आज शिवाजी पार्क येथे झाली. यावेळी नरेंद्र मोदीयांनी मी तुम्हाला विकसित भारत देऊन जाईन, ही माझी गॅरंटी आहे, असं सूचक विधान करत विकसित भारताचा रोडमॅप मतदारांसमोर मांडला.

नरेंद्र मोदी उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की,मुंबईमध्येपुढच्या काळात रेकॉर्डब्रेक गुंतवणूक येणार आहे. येत्या काही वर्षांतच जेव्हा मी तुमच्यामध्ये येईन, तेव्हा आपण जगातीत तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनलेले असू, ही माझी गॅरंटी आहे. मी तुम्हाला गॅरंटी देण्यासाठी आणि तुमच्या मुलांना विश्वास देण्यासाठी आलो आहे की, मी तुम्हाला विकसित भारत देऊन जाईन. त्यामुळे नरेंद्र मोदी २४ बाय ७, २०४७ च्या मंत्रासह काम करत आहे, असे मोदी म्हणाले.यावेळी नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर निशाणा साधला.

ते म्हणाले की, काँग्रेसने २०१४ मध्ये सत्ता सोडली तेव्हा देशाची अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांकावर होती.

मात्र आम्ही देशाच्या अर्थव्यवस्थेला पाचव्या क्रमांकावर आणलं आहे. काँग्रेसचे पंतप्रधान आपल्या भाषणांमधून गरीब गरीब असा मंत्र जपायचे. मात्र आम्ही २५ कोटी भारतीयांना दारिद्र रेषेतून वर आणले आहे, असेही मोदींनी यावेळी सांगितले.

ॲड.अभय छाजेड यांची ओरिसात निरीक्षकपदी नेमणूक

राजदंड न्यूज नेटवर्क पुणे : ओरिसामधील बालासोर लोकसभा मतदार संघासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. अभय छाजेड यांची अ. भा. काँग्रेस पक्षातर्फे निवडणूक निरीक्षकपदी नेमणूक करण्यात आली आहे.

ओरिसामध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाचवेळी होत असून बालासोर मतदार संघात ७ विधानसभा मतदार संघ आहेत. माजी केंद्रीयमंत्री श्रीकांत जेना हे काँग्रेस पक्षाचे तेथे उमेदवार आहेत.

बालासोर लोकसभा मतदार संघात अखेरच्या टप्प्यात १ जून रोजी मतदान होणार आहे. पुणे लोकसभा मतदार संघातील जबाबदारी संपवून ॲड.अभय छाजेड ओरिसातील बालासोर येथे रवाना झाले.

राठीला अभिजात भाषेचा दर्जा, संविधान, गडकिल्ले

...राज ठाकरेंच्या PM मोदींकडे 'या' मागण्या

राजदंड न्यूज नेटवर्क : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील छत्रपती शिवाजी पार्क मैदानावर महायुतीची सभा झाली. राज्यातील महायुतीच्या या सांगता सभेत पंतप्रधान मोदी आणि मनसे प्रमुखराज ठाकरे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर आले. यावेळी राज ठाकरेंनी आपल्या भाषणा विरोधकांवर टीका करण्यासोबतच पंतप्रधान मोदींना पाच मागण्या केल्या.

PM मोदींच्या नेतृत्वात महाराष्ट्रासह देशाचा विकास झाला. आपल्या भाषणाची सुरुवात करताना राज ठाकरे म्हणाले की, 'पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होणारे नरेंद्र मोदी आहेत, मी त्यांचे स्वागत करतो. २०१४-२०१९ च्या मोदींच्या कार्यकाळाबद्दल जे बोलायचे होते, ते मी २०१९ ला बोललो. आता २०१९ ते आत्तापर्यंतचे बोलू. बाबरी मशिद पाडली, तेव्हा कारसेवकांना ठार मारण्यात आले. मला वाटले नव्हते की, राम मंदिर बनेल. पण, मीनरेंद्र मोदींनाधन्यवाद

देतो की, ते होते म्हणून आज राम मंदिर तयार झाले, अन्यथा ते झाले नसते.''उद्धव ठाकरेंनी तमाम हिंदू बांधवांनो म्हणणे सोडून दिले', देवेंद्र फडणवीसांची बोचरी टीका'देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जम्मू-काश्मीरचा मुद्दा तसाच होता. पण मोदींनी कलम ३७० हटवले आणि आज खऱ्या अर्थाने जम्मू-काश्मीर भारताचा भाग झाला आहे. पंतप्रधान मोदींनी देशातून ट्रिपल तलाकसारखा कायदा रद्द केला आणि या देशातील सर्व मुस्लीम महिलांना न्याय मिळून दिला. त्या मुस्लिम महिलांमद्ये समाधानाचे वातावरण तयार झाले. मी या सर्व गोष्टींना सर्वात धाडसी निर्णय मानतो,' असे राज ठाकरे यावेळी म्हणाले. तसेच, पंतप्रधान मोदींना पाच मागण्या केल्या.

पंतप्रधान मोदींसमोर राज ठाकरेंनी मांडल्या 'या' मागण्या

१. अनेक वर्षांपासून खितपत पडलेला प्रश्न म्हणजे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा. पंतप्रधान झाल्यावर तो सन्मान मराठी भाषेला मिळेल अशी अपेक्षा करतो.

२. या देशातील शालेय शिक्षणात मुलांना मराठा साम्राज्याचा इतिहासात शिकवला जावा.

३. छत्रपतींची खरी स्मारके गडकिल्ले आहेत. या गडकिल्ल्यांना पूर्वीचे ऐतिहासिक वैभव प्राप्त करण्याकरता आंतरराष्ट्रीय समिती स्थापन करावी.

४. गेली १८-१९ वर्षेमुंबईगोवा महामार्ग अजूनही तसाच आहे, तो लवकरात लवकर व्हावा.

५. या भारतामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या संविधानाला धक्का कुणी लावणार नाही, हे विरोधकांना खडसावून सांगा आणि त्यांची तोंडं एकदाची बंद करा.

६. या भारतात अनेक देशभक्त मुसलमान आहेत, जे या देशावर प्रेम करतात. पण, काही मूठभर आहेत, जे उद्धव ठाकरेंना आणि काँग्रेसला पाठिंबा देतात. त्यांना गेल्या १० वर्षात डोकं काढता आलं नाही. त्यांचे अड्डे तपासून घ्या, तिथं माणसं, सैन्य घुसवून अड्डे नष्ट करा.

७. मुंबई रेल्वेकडे लक्ष द्या, त्यासाठी जास्तीत जास्त पैसे द्या, अशा मागण्या राज ठाकरेंनी मोदींना केल्या.

एकाधिकारशाही संपवण्यासाठी भाजपाला हद्दपार करण्याची गरज

शरद पवारांचा घणाघात

भिवंडी : देशाची राज्यघटना बदलण्यासाठी ४०० पार चा नारा देणाऱ्या भाजपाच्या एकाधिकारशाहीला संपवण्याची गरज आहे,अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे. ते महाविकास आघाडीचे भिवंडी लोकसभेतील उमेदवार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या प्रचारासाठी पोगावं येथे आयोजित परिवर्तन सभेत बोलत होते. या सभेस दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, दिल्लीचे खासदार संजय सिंह,खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड,अनिल देशमुख,राजेश टोपे,आरपीआय सेक्युलरचे राष्ट्रीय अध्यक्ष श्यामदादा गायकवाड, समाजवादी पार्टीचे आमदार रईस शेख, ठाकरे गटाच्या उपनेत्या

ज्योती ठाकरे,भिवंडी लोकसभा संपर्क प्रमुख माजी आमदार रुपेश म्हात्रे,जिल्हा प्रमुख विश्वास थळे,काँग्रेस शहराध्यक्ष रशीद ताहीर यांसह मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

या देशातील मंदिर मस्जिद सुरक्षित ठेवणे हे सर्वांची जबाबदारी असताना भाजपा जाणीवपूर्वक दोन समाजात तेढ निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा आरोप देखील पवारांनी केला.

निवडणुकीत पराभव समोर दिसत असताना मोदी यांनी खोट्या केसेस मध्ये अडकवून मला कारागृहात टाकले,जामिनावर बाहेर असताना दिवसरात्र मेहनत करून २१ दिवसात भाजपाला पराभूत करूनच कारागृहात परत जाईल असा निर्धार व्यक्त करीत देशाला वाचविण्यासाठी मतदानाची भिक मागण्यासाठी मी भिवंडीत आलो आहे असे वक्तव्य दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केले.दिल्लीत गरिबांच्या मुलांसाठी मोफत शिक्षण, मोफत वीज,मोफत रुग्णालय उपचार मोफत औषध देण्याचे काम आम्ही करतो दिल्लीमध्ये ५०० मोहल्ला क्लिनिक बनवल्या मोदी यांनी देशभरात ५ हजार मोहल्ला क्लिनिक सुरू केल्या असता तर त्यांचा सन्मान केला असता.

रशियाचा नेता पुतीन याने विरोधकांना मारले कारागृहात टाकले,बांगलादेश व पाकिस्तान मध्ये सुध्दा असेच करुंन सत्ता हस्तगत केली ,भारताकडून जग शिकते पण मोदी बांगलादेश पाकिस्तान यांच्या कडून शिकून तसेच काम भारतात करू इच्छितात असा आरोप केजरीवाल यांनी यावेळी केला. नरेंद्र मोदी हे भयग्रस्त असून पक्षात ७५ वर्षांवरील नेत्यांना राजकारणातून निवृत्ती देणारे मोदी देखील पुढील वर्षी ७५ वर्षांचे होणार असल्याने ते मत मागत आहेत ते अमित शहा यांना प्रधानमंत्री बनवण्यासाठी असा आरोप देखील केजरीवाल यांनी केला.

PM मोदींच्या नेतृत्वात महाराष्ट्रासह देशाचा विकास झाला

अजित पवारांचा विरोधकांवर निशाणा

राजदंड न्यूज नेटवर्क : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महत्वाचा दिवस आहे. राज्याची राजधानी मुंबईत सत्ताधारी आणि विरोधकांच्या एकाच दिवशी सभा होत आहे. एकीकडे मुंबईच्या छत्रपती शिवाजी पार्क मैदानावर महायुतीने सभा आयोजित केली आहे, तर दुसरीकडे महाविकास आघाडीची सभा बीकेसी मैदानावर होत आहे. महायुतीच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस, राज ठाकरे, रामदास आठवलेंसह अनेक नेते उपस्थित आहेत.

अजित पवारांचा विरोधकांवर निशाणा

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. अजित पवार म्हणतात, 'पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात महाराष्ट्रासह देशाचा विकास झाला. गेल्या दहा वर्षात मोदींनी देशाला पुढे नेण्याचे काम केले.

त्यांचे कणखर नेतृत्व देशाला प्रगतीच्या शिखरावर घेऊन जाणार आहे. म्हणूनच आपल्याला तिसऱ्यांदा त्यांना पंतप्रधान करण्याचा संकल्प करायचा आहे.'

'विरोधकांकडे विकासाचा मुद्दा राहिलेला नाही. आम्ही सातत्याने विकासाबद्दल बोलतोय. पण विरोधक त्याला फाटा देत आहे. नको ती भाषणं करत आहेत. विरोधकांची भाषणं काढून बघा...त्यांचे शब्द बघा...आपण महाराष्ट्राला सुसंस्कृत राज्य म्हणतो, पण कुठल्या प्रकारची भाषा वापरतात. विरोधक कुठलाही मुद्दा काढून समाजात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.'

'गेल्या दहा वर्षात नरेंद्र मोदींनी संविधान दिन साजरा करण्यास सुरुवात केली. पण, विरोधकांकडून संविधान बदलण्याची भाषा वापरली जात आहे, हे थांबलं पाहिजे. ते काम तुमच्या मतातून करता येईल. सर्वांनी महायुतीला मतदान करुन विरोधकांना जशासतसे उत्तर द्यायला हवे,' असे आवाहन देखील त्यांनी उपस्थितांना केले.

नाशिक, दिंडोरी लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

राजदंड न्यूज नेटवर्क : सोमवारी (दि.२०) होत असलेल्या जिल्ह्यातीलनाशिकव दिंडोरी लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक विभाग सज्ज झाला असून मतदानासाठी जास्तीचा प्रवास नसावा, मतदारांची पायपीट थांबावी यासाठी प्रत्येक दोन किलोमीटरच्या आत किमान एक मतदान केंद्र असेल. आदिवासी बहुल असलेल्या दुर्गम भागात सॅटेलाईटची सुविधा कार्यान्वित करण्यात येणार असून संपर्कासाठी वॉकिटॉकीची सुविधा असेल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा मुख्य निवडणूक अधिकारी जलज शर्मा यांनी पत्रकार परिषदेत दिली.निवडणुकीसाठी झालेल्या तयारीची माहिती शर्मा यांनी दिली. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधी, निवडणूक उपजिल्हाधिकारी शशिकांत मंगरूळे, माहिती अधिकारी सप्रंता बिडकर उपस्थित होते. प्रत्येक मतदान केंद्रावर गरज पडल्यास रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यासोबतच जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय पथकास सज्ज राहण्याची सूचना देण्यात आल्याची माहिती जलज शर्मा यांनी दिली. नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघ मिळून ४४ भरारी पथके, ८२ स्थायी पथके, २४ चलचित्र सर्वेक्षण पथके, १२ चलचित्र निरीक्षण पथके, १६ आंतरजिल्हा, आंतरराज्य तपासणी नाक्यासह सज्ज आहेत. भरारी व स्थायी पथकांमध्ये केंद्रीय पोलिस दलाचे सदस्य समाविष्ट केले आहेत.- मतदान कर्मचारी : एकूण ११० टक्के प्रमाणात १७ हजार २८ कर्मचारी केंद्रावर नियुक्त केले जाणार आहेत. ज्यामध्ये एकूण ५०८२ महिला कर्मचारी आहेत.

- वाहतूक व्यवस्था : मतदान कर्मचारी व मतदान यंत्रे याकरिता ५३० बसेस यासह १२५२ वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

- वेबकास्टिंग : नाशिक लोकसभा मतदारसंघात ९५५ केंद्रावर तर दिंडोरी लोकसभा मतदारसंघात ९६१ केंद्रांवर बेवकास्टिंगची पूर्वतयारी पूर्ण झालेली आहे.

- **सूक्ष्म निरीक्षक :** दिंडोरी लोकसभा मतदारसंघाकरिता १३०, तर नाशिक लोकसभा मतदारसंघाकरिता २४० सूक्ष्म निरीक्षक () यांची नेमणूक करण्यात आली आहे. नियुक्त करण्यात आलेले निरीक्षक त्यांचा अहवाल मुख्य निवडणूक निरीक्षक यांच्याकडे सादर करतील.

- **दिव्यांग मतदार :** नाशिक जिल्ह्यात २,३१७ ठिकाणी व्हीलचेअरची सोय करण्यात येईल. ६२२ मतदारांना वाहतूक सुविधा पुरविण्याची पूर्वतयारी करण्यात आलेली आहे.

मद्य धोरण प्रकरणात ‘आप’देखील आरोपी: ईडीने दाखल केले नवे आरोपपत्र

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्रीअरविंद केजरीवालअनेक आघाड्यांवर लढत असताना ईडीनेअरविंद केजरीवालआणि त्यांच्या आम आदमी पार्टीविरुद्ध आरोपी म्हणून नवीन आरोपपत्र दाखल केले आहे. १९५१ नंतर देशाच्या इतिहासात प्रथमच एखाद्या राजकीय पक्षाला आरोपी म्हणून ठरविण्यात आले.ईडीने उचललेल्या या पावलामुळे आपची राजकीय पक्ष म्हणून मान्यता रद्द केली जाऊ शकते. हे आरोपपत्र २०० पानांचे असून येत्या काही दिवसांत या आरोपपत्रावर सुनावणी घेण्याची शक्यता आहे.

या प्रकरणात ईडीने दाखल केलेले हे आठवे आरोपपत्र आहे. ज्यात आतापर्यंत १८ जणांना अटक केली आहे.आपआणि केजरीवाल यांनी कथित मद्य धोरणातील सर्व

इतिहासातील पहिलीच घटना

आरोप ठामपणे फेटाळले आहेत आणि भाजपवर राजकीय सूडबुद्धीने वागवत असल्याचा आरोप केला आहे. ईडीने मार्चमध्ये केजरीवाल यांना अटक केली होती. न्यायालयाच्या परवानगीने ते १ जूनपर्यंत प्रचारासाठी ते जामिनावर बाहेर आहे. त्यांना २ जून रोजी आत्मसमर्पण करावे लागेल.

आप ही एक कंपनी किंवा सोसायटी नसल्यामुळे भारतीय लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ अंतर्गत एखाद्या राजकीय पक्षाला आरोपी बनवता येईल की नाही यावरून आपचा हा खटला प्रातिनिधिक ठरणार आहे. ईडीने दाखल केलेले आरोपपत्र ही दीर्घकाळ चाललेल्या कायदेशीर लढाईची सुरुवात आहे जी थेटसर्वोच्च न्यायालयापर्यंतजाईल, असे कायदेशीर तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

९० च्या दशकात झारखंड मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष शिबू सोरेन व इतर खासदारांनी पी. व्ही. नरसिंह राव सरकार वाचवण्यास लोकसभेत मते देण्यासाठी लाच घेतली होती. त्या प्रकरणातसर्वोच्च न्यायालयानेत्यांना कायदेशीर कारणास्तव दिलासा दिला. ३० वर्षांनंतर हा खटला पुन्हा सुरू झाला; परंतु तपास पथकाने झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाची मान्यता रद्द करण्याची मागणी केली नव्हती.

दल्ली मद्य धोरण प्रकरणात ईडीने केलेली अटक आणि कोठडीला आव्हान देणाऱ्या दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी पूर्ण करीत सर्वोच्च न्यायालयाने निकाल सुरक्षित ठेवला. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्या. दीपांकर दत्ता यांनी केजरीवाल यांना याच याचिकेवरील सुनावणीदरम्यान लोकसभा निवडणुकीत प्रचार करण्यासाठी १० मे रोजी अंतरिम जामीन मंजूर केला होता.

शुक्रवारी ईडीकडून अतिरिक्त सॉलिसीटर जनरल एस. व्ही. राजू यांनी युक्तिवाद पूर्ण केल्यानंतर केजरीवाल यांच्यावतीने ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांनी बाजू मांडली.

संपादकीय

अंदाज पावसाचा

अंदाज खरा ठरला की, आनंद होतो. खोटा ठरला की, निराशा येते. गृहीतांमध्ये ऐनवेळी बदल झाल्यास अंदाज चुकतात. तो खरा की खोटा ठरविणे कठीण बनते. भारतीय उपखंडावर कोसळणाऱ्या नैऋत्य मान्सून पावसाचेदेखील तसेच आहे. हवामानशास्त्राचा विकास-विस्तार होत असल्याने अलीकडच्या काही वर्षांत मान्सूनचा पाऊस किती प्रमाणात होईल, याचा अंदाज बांधणे शक्य होत चालले आहे.भारतीय हवामानशास्त्र विभागाने येत्या १ जूनपासून सुरू होणाऱ्या नैऋत्य मान्सून पावसाचा अंदाज नुकताच व्यक्त केला आहे. त्यानुसार येत्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा दोन टक्के अधिकच पाऊस होईल, असे म्हटले आहे. गतवर्षी सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार ५.६ टक्के पाऊस कमीच झाला. भारताच्या अर्थकारणासाठी मान्सूनचा पाऊस फारच महत्त्वाचा ठरतो. कारण भारताची लोकसंख्या प्रचंड आहे. अन्नाच्या सुरक्षेसाठी शेतीवर अवलंबून राहावे लागते. भारताची निम्म्याहून अधिकची लागवडीखालील शेती मान्सूनच्या पावसावर थेट अवलंबून आहे. जी शेती ओलिताखाली आहे तिच्यासाठी हवे ते पाणी मान्सूनच देतो आहे. लोकसंख्या आणि अर्थकारण या दोन मुद्यांचा विचार करता मान्सूनचा पाऊस चांगला होणे, तसा अंदाज येणे ही मोठी आनंदाची बातमी ठरते.गतवर्षी सरासरी साडेपाच टक्केच पाऊस कमी झाला असला, तरी तो वेळी-अवेळी झाला. परिणामी, भारतीय पीकपद्धतीला अनुकूल राहिला नाही. त्याचा कृषी उत्पादनावर मोठा परिणाम जाणवला. महाराष्ट्र, कर्नाटकासह काही प्रदेशांत एकही पीक साधले नाही. पाण्याचा साठा झाला नाही. ते प्रदेश आज पिण्याच्या पाण्यासाठी झगडत आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटक सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरी त्यावरील उपाययोजना आखलेल्या नाहीत. काही सवलती कृषी क्षेत्राला दिल्या आहेत. विद्यार्थ्यांची फी माफी केली आहे. वीजबिलाची वसुली आणि कर्जवसुलीसाठी तगादा लावायचा नाही, इतकाच काही तो दिलासा दिला आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर बदलत्या जीवनपद्धतीत दुष्काळ पडणे आता परवडणारे नाही.

दुष्काळ निवारणासाठी खूप मोठा खर्च येतो. अन्न आणि पाणी एवढ्याच माणसांच्या गरजा नाहीत. दरमाणसी पाण्याची गरज वाढली आहे. विजेचा वापर वाढला आहे. खाण्यापिण्याच्या सवयी बदललेल्या आहेत. या सर्व निकषांच्या आधारे मान्सूनच्या पावसाकडे पाहिले तर त्याचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. त्यासाठी मान्सून वेळेवर येणार, तो अपेक्षेप्रमाणे कोसळणार याची मान्सूनपूर्व लक्षणे दिसणे हे शुभवर्तमान मानले पाहिजे.भारताची अर्थव्यवस्था साडेतीन ट्रिलियन डॉलर्सवरून पाच ट्रिलियन इतकी मोठी करायची असेल तर मान्सूनची साथ लागणार आहे. पाणी, कृषी उत्पादने आणि अन्न सुरक्षा ही गरज कारखान्यात उत्पादित करून भागविता येणार नाही. भारतीय हवामानशास्त्र विभागाने केलेल्या पाहणीनुसार, मान्सूनचा पहिला शिडकावा येत्या रविवारी, १९ मे रोजी अंदमान-निकोबार बेटावर होईल. बंगालच्या उपसागरातून तो पश्चिमेकडे सरकेल आणि नैऋत्य मोसमी वाऱ्यांचे प्रवेशद्वार असलेल्या केरळमध्ये १ जून रोजी प्रवेश करेल. आपला पावसाचा हंगाम १ जून ते ३० सप्टेंबर आहे. गतवर्षी यातील निम्मे दिवस भाकड गेले होते. त्याचा परिणाम खरीप हंगामावर झाला. मान्सूनच्या परतीचा पाऊस झालाच नाही, त्याचा परिणाम रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीवर होऊन गेला. देशाच्या अनेक भागांत खरीप आणि रब्बीचे दोन्ही हंगाम साधले गेले नाहीत. असंख्य धरणे क्षमतेप्रमाणे भरली नाहीत. पाण्यासाठी मोजपट्टी लावण्याची वेळ आली आहे. हा सर्व मान्सूनच्या लहरीपणाचा फटका आहे. भारतीय उपखंडावर पडणाऱ्या पावसाचा थेट संबंध ज्या नैसर्गिक साधनांवर अवलंबून आहे, त्याचे संवर्धन करण्याकडे लक्ष दिले गेले पाहिजे. शिवाय या मान्सूनच्या पावसाने उपलब्ध होणारे पाणी अधिकाधिक साठवून ठेवण्याचे उपाय करावे लागतील.

सरासरी पाऊस पडणार म्हणजे आपोआप पाण्याची उपलब्धता निर्माण होणार नाही. ते धरणात, तळ्यात किंवा बंधाऱ्यात साठविण्याइतकेच जमिनीत साठविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. सांगली जिल्ह्यातील जतसारख्या कोरडवाहू तालुक्यात यावर्षी पाणीपातळी अकराशे फुटांच्या खाली गेली आहे. जमिनीची चाळण करून पाणी मिळत नसते. चाळणीत काही पडले तर त्याचा पाझर उपयुक्त ठरणारा असू शकतो. तेव्हा मान्सूनच्या आगमनाचा आनंद साजरा करताना त्याचे संवर्धनही कसे उत्तम होईल, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. निसर्ग देत राहणार आणि आपण त्याचे जतन करणार नसू तर मान्सून वेळेवर येण्याच्या आनंदाची बातमी फार काळ दिलासा देणारी नसेल.

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेमधून १.८४ लाख ग्राहकांची २.२१ कोटींची बचत

पश्चिम महाराष्ट्रातील स्थिती; पुणे परिमंडलाची राज्यात आघाडी

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : महावितरणच्या गो-ग्रीन योजनेत सहभागी होऊन वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत पश्चिम महाराष्ट्रातील आतापर्यंत १ लाख ८४ हजार २२० वीजग्राहकांनी केवळ 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडला असून त्यांची तब्बल २ कोटी २१ लाख रूपयांची वार्षिक बचत होत आहे. तर या योजनेत पुणे परिमंडलातील १ लाख २३ हजार वीजग्राहकांनी राज्यात सर्वाधिक संख्येने गो-ग्रीन योजनेत सहभाग घेतला आहे.

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेनुसार छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वार्षिक १२० रुपयांची वीजबिलांमध्ये बचत होत आहे. वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संगणकीय प्रणालीद्वारे ते 'गो-ग्रीन'मधील ग्राहकांना 'ई-मेल'द्वारे पाठविण्यात येत आहे. सोबतच 'एसएमएस'द्वारे देखील वीजबिलाची माहिती देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांना प्रॉम्प्ट पेमेंटचा त्वरीत लाभ घेणे आणखी शक्य झाले आहे.

दिवसेंदिवस पर्यावरणात प्रतिकूल बदल होत आहे. त्यामुळे पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजना ही काळाची गरज झाली आहे. वीजबिलाची सॉफ्ट कॉपी जतन करून ज्यावेळी आवश्यकता असेल तेव्हा वीजबिलाची कागदी प्रिंट काढता येते. त्यामुळे कागदी मासिक बिलाचा वापर बंद करून गो-ग्रीन योजनेत वीजग्राहकांनी सहभागी व्हावे असे आवाहन पुणे प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे यांनी केले आहे.

पुणे प्रादेशिक विभाग अंतर्गत राज्यात पुणे परिमंडलाने गो-ग्रीन योजनेत सर्वाधिक आघाडी घेतली आहे. पुणे परिमंडलातील १ लाख २३ हजार ४०३ वीजग्राहक या योजनेच्या माध्यमातून १ कोटी ४८ लाख ८ हजार ३६० रुपयांची वार्षिक बचत करीत आहे. तर बारामती परिमंडल अंतर्गत ३३ हजार ७३८ वीजग्राहक ४० लाख ४८ हजार ५६० रुपयांची बचत करीत आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील १२ हजार ९७७, सातारा जिल्ह्यातील १२ हजार १९० आणि बारामती मंडलमधील ८ हजार ५७१ ग्राहकांचा समावेश आहे. तर कोल्हापूर परिमंडलातील २७ हजार ७९ ग्राहक या योजनेतून ३२ लाख ४९ हजार ४८० रुपयांची बचत करीत आहे. यामध्ये कोल्हापूर-१६ हजार ६१५ आणि सांगली जिल्ह्यातील १० हजार ४६४ ग्राहकांचा समावेश आहे.

वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेचा पर्याय निवडण्यासाठी महावितरणचे मोबाईल ॲप किंवा ् .ारहरवळीले.ळप संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झालेल्या वीजग्राहकांना छापील वीजबिलांची गरज भासल्यास त्यांना ईमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येईल. सोबतच संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

शहरातील अनधिकृत होर्डिंग तातडीने काढा : आबा बागुल

पुणे : पुणे शहरातील अनधिकृत होर्डिंग तातडीने काढा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आबा बागुल यांनी पुणे मनपा आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे केली आहे.

मुंबईमध्ये अनधिकृत होर्डिंग पडल्याने अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला. काही वर्षांपूर्वी पुणे शहरातील जुन्या बाजाराजवळील होर्डिंग पडल्याने ३ निष्पाप पुणेकरांना जीव गमवावा लागला आहे. परंतु, पुणे शहरात होर्डिंगची परिस्थिती पाहता अनेक ठिकाणी अनधिकृत होर्डिंग असलेले निदर्शनास येत आहे. अश्या सर्व होर्डिंगवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश आपण संधितांना द्यावेत. तसेच, अनधिकृत होर्डिंगची तपासणी करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत. पुणे शहरातील अनधिकृत होर्डिंगवर तातडीने कारवाई न झाल्यास व या अनागोंदी कारभारामुळे पुणेकरांना जीव गमवावा लागला, तर त्याची सर्व जबाबदारी ही आपली राहील. आपण यावर त्वरित कारवाई न केल्यास काँग्रेस पक्ष तीव्र आंदोलन करेल याची नोंद घ्यावी, असेही बागुल यांनी निवेदनात म्हटले आहे.

तासगावात १२ जणांना होर्डिंगबाबत नोटीस

तासगाव नगर परिषद
जि. सांगली

तासगाव : मुंबई घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर तासगाव नगरपालिकेने शहरातील १२ जणांना या होर्डिंगबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. दरम्यान, शहरातील धोकादायक होर्डिंग हटवावीत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

घाटकोपर येथे पेट्रोल पंपावर होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत २४ जणांचा मृत्यू झाला. त्या पार्श्वभूमीवर तासगाव पालिका प्रशासन खडबडून जागे झाले आहे. तासगाव शहरातील ज्या घरावर लोखंडी सांगाडे उभारून होर्डिंग लावण्यात आली आहेत अशा १२ जागां मालकांना नोटीस बजावण्यात आली असून विनापरवाना होर्डिंग

वर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. तासगांव शहरात गणपती मंदिर चौक, विटानाका, सांगली नाका, बायपास रोड, भिलवडीनाका, गुरूवारपेठ यासह इतर ठिकाणी मोठी होर्डिंग उभारण्यात आली आहेत, यापैकी काही होर्डिंग ही जुन्या इमारतीवर असून ती धोकादायक आहेत. या होर्डिंग वरील डिजिटल फलक अनेकदा वादळी वाऱ्याने पावसात उद्ध्वस्त झाल्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत. होर्डिंग जागेच्या मालकाला भाडे मिळते होर्डिंग उभारणाऱ्याला भाडे मिळते. एखादा घाटकोपर सारखा अपघात घडल्यास त्याला जबाबदार कोण या पार्श्वभूमीवर पालिकेने याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी होत आहे.

तासगाव शहरात १२ जणांना नोटीस देण्यात आली असून, ज्या ६६ इमारतीवर होर्डिंग उभारण्यात आले आहे, त्या इमारतीचे आणि होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे अनिवार्य आहे.

> **धोकादायक इमारतीवर उभी केलेली होर्डिंग त्वरित काढून घ्यावीत अन्यथा नगरपालिका काढणार असल्याच्या नोटीस बजावण्यात आली आहे. -**
> **पृथ्वीराज पाटील,**
> **मुख्याधिकारी**

सामान्य माणसाचे घर तोडणारे अधिकारी अनधिकृत होर्डींग का तोडत नाहीत

मुंबई : भ्रष्टाचाराने बरबटलेल्या अधिकाऱ्यांना श्रीमंतांची अनधिकृत बांधकामे दिसत नाहीत. मुंबईतील सामान्य माणसाचे घर तोडणारे अधिकारी अनधिकृत होर्डींग का तोडत नाहीत ? असा सवाल मुंबईतील सामान्य नागरिक करत आहे.

मुंबईतील घाटकोपर मध्ये एक विशाल बेकायदा होर्डिंग कोसळून १४ जणांना आपल्या जीव गमवावा लागला. तर या घटनेत ८८ पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत.या पार्श्वभूमीवर या घटनेसाठी भावेश भिंडे नावाची व्यक्ती जबाबदार असल्याची माहिती समोर आली आहे.

भावेश भिंडे हा इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेड या होर्डिंग कंपनी आणि जाहिरात एजन्सीचा मालक आहे. मुंबई महापालिकेने या कंपनीला नोटीस बजावली आहे. १० दिवसांच्या आत परिसरातील चार बेकायदेशीर होर्डिंग हटवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

मुंबईतील २४ नागरी प्रभागांमधील कोणत्याही होर्डिंगसाठी परवाना रद्द केला जाईल असंही सांगण्यात आलं आहे. जे होर्डिंग कोसळलं ते गृह विभाग आणि महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण कल्याण महामंडळाच्या मालकीच्या जमिनीवर मुंबई महानगर पालिकेची परवानगी न घेता उभारण्यात आले होते.

सोमवारी मुंबईसह उपनगरात वादळी वारा आणि अवकाळी पावसाने घाटकोपरच्या छेडा नगर जिमखाना, रिक्रिएशन सेंटर ३, येथील अंदाजे १२० ु १२० फुट होर्डिंग्स जमिनीतून उन्मळून जवळच असणा-या पेट्रोल पंपच्या छतावर कोसळलं . त्यावेळी जवळपास १५० वाहनं पेट्रोल पंपावर उपस्थित होती, काही पावसापासून आश्रय घेण्यासाठी ते पेट्रोल पंपावर थांबले होते. काही क्षणात हे होर्डिंग्स कोसळले. जवळ असलेली वाहने आणि शंभरहून अधिक नागरिक त्याखाली सापडले.

या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला असून ८८ जण जखमी झाले आहेत. त्यामुळे एकूण पीडितांची संख्या ८८ झाली आहे. मृतांमध्ये पूर्णिश जाधव (वय ५०),दिलीप पासवान (वय ३४),बशीर अहमद (वय ५२), फहिम खलील खान (वय २२),हंसनाथ गुप्ता (वय ७१),सतीश सिंह (वय ५२),चंद्रमनी प्रजापती (वय ४५),महंमद अक्रम (वय ४८),भारत राठोड (वय २४),दिनेशकुमार जैस्वार(वय ४४),सचिन महेशकुमार यादव (वय २३) अशी या बारा जणांची नावे असून अन्य दोघांची अद्यापही ओळख पटलेली नाही.

दुर्घटनास्थळी चार होर्डिंग्स होते. यासाठी मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्तांनी परवानगी दिली होती. मात्र होर्डिंग्ज उभारण्यापूर्वी बीएमसीची कोणतीही परवानगी रेल्वेकडून घेण्यात आली नव्हती. अशी माहिती समोर आली आहे.

बीएमसी जास्तीत जास्त ४० ु ४० चौरस फूट होर्डिंग उभारण्याची परवानगी देते मात्र, कोसळलेले होर्डिंग १२० ु १२० चौरस फूट आकाराचे होते. सध्या बीएमसी एन वॉर्डच्या सहाय्यक आयुक्तांनी एजन्सीला बीएमसीची वैध परवानगी नसल्याबद्दल त्यांचे सर्व होर्डिंग तातडीने काढून टाकण्याची नोटीस बजावली आहे. तसंच पोलिसांकडून भावेश भिंडेंचा शोध घेतला जात आहे असे परिमंडळ ७ चे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी सांगितले.

मनसे, एमआयएमची मते ठरणार निर्णायक

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे लोकसभा निवडणुकीत महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित या तिन्ही उमेदवारांत जोरदार लढत झाली. या निवडणुकीत विजयी उमेदवारांमध्ये मनसे आणि एमआयएमची निर्णायक ठरणार आहे. कोंढवा, वडगांवशेरी, येरवडा भागात मोठ्या प्रमाणात मतदान झाले आहे. काँग्रेस, भजप या दोन्ही पक्षांना या परिसरातून चांगले मतदान झाले आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघात एकूण २० लाख ६१ हजार २७६ मतदार असून यामध्ये १० लाख ५७ हजार ८७७ पुरूष मतदार, १० लाख ३ हजार ७५ महिला मतदार आणि ३२४ इतर मतदार आहेत. त्यापैकी ११ लाख ३ हजार ६७८ जणांनी मतदानाचा हक्क बजाविला आहे. त्यामध्ये ५ लाख ८४ हजार ५११ पुरुष तर ५ लाख १९ हजार ७८ महिला आणि इतर ८९ जणांनी मतदान केले आहे.

पर्वती, पुणे क्यान्टोन्मेंट, कसबा पेठ, शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसला चांगले मतदान झाल्याची चर्चा सुरू आहे. महायुतीचे मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी जोरदार प्रचार केला. आता ४ जून रोजी निकाल लागणार आहे. वंचितचे वसंतराव मोरे यांनीही चांगली मते मिळविल्याची कुजबुज सुरू आहे. पुणे लोकसभा निवडणुकीत तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट चित्र आहे.

गायक कलाकारांच्या 'पुणे आयडॉल २०२४' गायन स्पर्धा २७ मे ला सुरू होणार

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : सोमेश्वर फाउंडेशनतर्फे महाराष्ट्रातील हौशी गायक कलाकरांसाठी दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या 'पुणे आयडॉल २०२४' स्पर्धेचे २७ मे ते २ जून रोजी सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने माजी नगरसेवक सनी निम्हण यांनी होणार असल्याचे आज जाहीर केले.

स्व. आमदार विनायक निम्हण यांनी सन २००२ साली सुरू केलेल्या या स्पर्धे चे यंदा २३ वे वर्ष आहे. प्रसिद्ध गायक अरूण दाते, प्रभा अत्रे, रविंद्र साठे, महेश काळे, त्यागराज खाडिलकर, डॉ. सलील कुलकर्णी, शौनक अभिषेकी, राहुल देशपांडे, वैशाली सामंत, अभिजित सावंत, अभिजित कोसंबी अशा गायक क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी या स्पर्धेच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना मार्गदर्शन केले आहे. सौरभ साळुंके, कोमल कृष्ण, तुषार रिठे, प्रमोद डाडर, विनोद सुर्वे, महंमद रफी अशा अनेक प्रतिभावंत कलाकारांनी गायन क्षेत्रात आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.

स्पर्धेचे परिक्षक म्हणून श्रीपाद सोलापूरकर, मेधा चांदवडकर, मंजुश्री ओक, राजेश दातार, दिपक कुलकर्णी आदी सहभागी होणार असल्याचे गायक जितेंद्र भूरूक यांनी सांगितले. वय वर्षे १५ पर्यंत 'लिटिल चॅम्प्स', '१५ ते ३० वर्ष युवा आवाज', 'वय वर्ष ३० ते ५० जनरल हवा हवाही' 'वय वर्ष ५० नंतर ओल्ड इज गोल्ड' अशा चार गटात होणार आहेत. सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या हौशी कलाकारांना विशेष निमंत्रित करून त्यांना गाण्याची संधी व सोमेश्वर फाउंडेशन तर्फे सन्मानित केले जाणार आहे.

प्रत्येक गटातील विजेत्यास रोख रक्कम रूपये, १५ हजार, १० हजार व ५ हजार व मानाचे पुणे आयडॉल सन्मान चिन्ह दिले जाणार आहे. काही उत्तेजनार्थ गायक निवडून लाखो रूपयांचे रोख बक्षीस दिली जाणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेते मोहन जोशी (❊ज्यांनी आपल्या कलेचा अविष्कार आपल्या गायिकीने ऑर्केस्ट्राच्या माध्यमातून सुरू केला आहे❊) यांच्या हस्ते सकाळी ९.३० वा. पंडित भीमसेन जोशी सभागृह, औंध येथे होणार आहे.

अंतीम फेरी २ जून रोजी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे होणार असल्याचे सांगितले. स्पर्धेचे फॉर्म ❊.ींपपूपळाहरप. लो❊ येथे तसेच सोमेश्वर फाउंडेशन, मो. ❊८३०८१२३५५५❊ शिवाजीनगर, गावठाण, जे.एम. रोड, पुणे येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. प्रवेशाची अंतीम तारीख २५ मे २०२४ राहिल. स्पर्धे साठी अमित मुरकूटे, अनिकेत कपोते, गणेश शेलार, सचिन मानवतकर, प्रमोद कांबळे आदी नियोजन करत आहेत.

गोकुळच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि. कोल्हापूर (गोकुळ) सोलर ओपन ॲक्सेस स्कीम अंतर्गत ६.५ मेगा वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी मे.सर्जन रिलिटीज प्रा.लि.पुणे यांच्या करमाळा येथील सोलर पार्क मध्ये संघाने खरेदी केलेल्या १८ एकर जागेचा भूमिपूजन समारंभ गोकुळचे संचालक अजित नरके व अभिजित तायशेटे यांच्या शुभहस्ते व संचालक मंडळाच्या उपस्थितीत करमाळा येथे पार पडला.

यावेळी बोलताना संघाचे संचालक अजित नरके म्हणाले कि, सध्या गोकुळ मुख्यालयाकडील वर्षाकाठी जवळजवळ वीज बिलाचा खर्च १३ कोटी इतका येतो. हा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे ठरविले त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात करमाळा तालुक्यामध्ये २०० एकरवर पुणे येथील सर्जन रिलिटीज प्रा.लि.ही कंपनी सौर ऊर्जा निर्मिती करत आहेत यापैकी गोकुळने १८ एकर जागा खरेदी केली असून या जागेमध्ये ६.५ मेगा वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारला जारणार आहे. व त्याद्वारे वीज निर्मिती केली जाईल. एकूणच वार्षिक खर्चामध्ये बचतच होणार आहे असे सांगितले.

सौर ऊर्जा प्रकल्पाचा जागेसह खर्च रुपये ३३ कोटी ३३ लाख इतका होणार आहे व या प्रकल्पामुळे गोकुळ मुख्यालयाकडील वीज बिलामध्ये प्रतिवर्षी अंदाजे रुपये ६.५० कोटी इतकी बचत होणार आहे.

सदर प्रकल्प ३१ जुलै २०२४ पर्यंत पूर्णत्वास जाऊन ऑगस्ट २०२४ पासून प्रत्यक्षात वीज निर्मिती सुरू होणार असल्याचे गोकुळचे चेअरमन अरुण डोंगळे यांनी सांगितले.

याप्रसंगी संघाचे संचालक अभिजित तायशेटे, अजित नरके, शशिकांत पाटील-चुयेकर, किसन चौगले, नंदकुमार ढेंगे, संभाजी पाटील, अमरसिंह पाटील, बयाजी शेळके, कार्यकारी संचालक योगेश गोडबोले, व्यवस्थापक अभियांत्रिकी प्रताप पडवळ, सहा. व्यवस्थापक इलेक्ट्रिकल ए.आर. कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी सचिन पाटील, तसेच मे.सार्जन रिलिटीज प्रा.लि.पुणे चे प्रतिनिधी राजेश बांदल, सतीश व्यवहारे व संघाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

महिला सरपंचांना सी.एस. आर. फंडाची होणार मदत

सातारा : ग्रामपंचायतीला विकास कामे करण्यासाठी ग्राम निधी, वित्त आयोगाचा निधी अपुरा पडतो. जिल्ह्यातील महिला सरपंचांना याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी नाम फाऊंडेशन, दीपस्तंभ फाऊंडेशन,परांजपे ग्रुप लोकसहभागातून विकास कामास सीएसआर फंडातून शक्य ती मदत करु शकतात.यासाठी शुक्रवार दि.१७ में रोजी दु.१२ वाजता वर्ये येथील पंचायत राज प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात बैठक होणार असून जिल्ह्यातील महिला सरपंचांनी यावेळी उपस्थित रहावे ,असे आवाहन पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजय जाधव यांनी केले आहे.

या बैठकीला रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख, नाम फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात, दीपस्तंभ फाऊंडेशनचे अध्यक्ष अमेय जोशी, सरपंच परिषदेचे अध्यक्ष जितेंद्र भोसले, नाम फाऊंडेशन पश्चिम महाराष्ट्र समन्वयक बाळासाहेब शिंदे, परांजपे ग्रुपचे शिरीष पवार, केबीपी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ.बी. एस.सावंत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सातारा जिल्ह्यातील महिला सरपंचांना गावात जलसंधारण, शिक्षण,ग्राम विकास याबाबत लोक सहभागातून होणाऱ्या कामांना सीएसआर फंडातून प्रोत्साहन म्हणून मदतीसाठी हि बैठक आयोजित करण्यात आली आहे. यात गावातील सीएसआर फंडातून कोणती कामे करता येतील, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, प्रस्ताव कसा करावा, लोकसहभाग कसा अपेक्षित आहे, कामे कशी करावी लागणार आदी

नागपुरात ४०० अवैध होर्डिंग,यातील रेल्वेचे 200 होर्डिंग जीवघेण

नागपूर : अवैध होर्डिंग पडल्यामुळे मुंबईत १६ जणांचा जीव गेला. नागपुरातही चौकाचौकात उभे असलेले ४०० अवैध होर्डिंग्जनागपूरकरांसाठीयमदूत ठरु शकतात. राज्य सरकारच्या स्काय साईन आणि जाहिरातींच्या प्रदर्शनाचे नियमन आणि नियंत्रण कायद्याचे सर्रास उल्लंघन करणाऱ्या या होर्डिंग्जमुळे मोठा अपघातही होऊ शकतो. यातच रेल्वेने परवानगी दिलेले सुमारे २०० होर्डिंग्जही जीवघेणे ठरु शकतात. या संदर्भात काँग्रेसचे शहराध्यक्ष आ. विकास ठाकरे यांनी मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांना या अवैध होर्डिंग्जवर कारवाई करण्यासाठी तक्रार केली आहे. खासगी एजन्सीला लाभ मिळवून देण्यासाठी रेल्वेनेही २०० पेक्षा जास्त होर्डिंग्जला परवानगी दिली आहे. यापैकी एकही होर्डिंग महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये तयार केलेल्या दिशानिर्देशाप्रमाणे नाही. मात्र याचे कुठलेही संरचनात्मक स्थिरता ऑडिट करण्यात येत नाही. यापैकी अनेक होर्डिंग हे रेल्वे अंडरब्रिज, रेल्वे स्थानकांवर आहेत. याठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते.४०३० पेक्षा दुप्पट आकाराचे होर्डिंगहोर्डिंग कोसळून अनेकांचे जीव गेल्यावर यावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने २०२२ मध्ये स्काय साईन आणि जाहिरातींच्या प्रदर्शनाचे नियमन आणि नियंत्रण नियमावली तयार केली. यानुसार जास्तीत जास्त ४०३० फुटांपर्यंत होर्डिंगला परवानगी आहे. मात्र शहरात मोठ्या प्रमाणात या आकारापेक्षा तब्बल दुप्पट होर्डिंग चौकाचौकात उभे आहेत.

शहरातील सर्व 'युनिपोल' होर्डिंग बेकायदा

एकाच पोलवर उंच होर्डिंग लावण्यात येणाऱ्या होर्डिंगला 'युनिपोल होर्डिंग' असे म्हणतात. मात्र राज्य सरकारने तयार केलेल्या नियमावलीमध्ये यासंदर्भात कुठलीही तरतूद नाही. याशिवाय ४० फुटांपेक्षा जास्त उंचीवर एकही होर्डिंग लागू शकत नाही. मात्र युनिपोलवीरल बहुतांश पोलची उंची ही ८० फुटांच्यावर आहे. त्यामुळे एकाच पोलवरील इतक्या उंच होर्गिंड खालून ये-जा करणाऱ्या नागरिकांसाठी किती घातक ठरु शकतो याचा अंदाज लावता येतो. त्यामुळे सर्वप्रथम हे सर्व युनिपोल होर्डिंग काढून टाकणे हाच एकमेव पर्याय उरतो.एका स्ट्रक्चरवर एकच होर्डिंगला परवानगी

एका स्ट्रक्चरवर फक्त एका होर्डिंगची परवानगी असताना याठिकाणी दोन ते तीन होर्डिंग लावण्यात आले आहे. याशिवाय महानगरपालिका दर तीन वर्षांनी होर्डिंगच्या स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट मागत असते. तीन वर्षे हा मोठा काळ असून या होर्डिंगचे ऑडिट दर सहा महिन्यात करणे गरजेचे असल्याची मागणीही ठाकरे यांनी केली आहे.

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पूर आणि दरडप्रवण क्षेत्रात खबरदारीच्या सर्व उपाययोजना तयार ठेवा : जिल्हाधिकारी

सातारा : हवामान विभागाकडून सातारा जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आल्यावर पूर प्रवण व दरड प्रवण गावातील नागरिकांना त्यांच्या पशुधनासह तात्काळ हलविण्याची व्यवस्था करावी. नागरिकांच्या निवारा, अन्न, पाणी, विज आदी सोयी सुविधांबरोबर जनावरांसाठी पाण्याची व चाऱ्यांची व्यवस्था करावी. नागरिकांच्या स्थलांतराची जबाबदारी ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व कोतवाल यांच्याकडे द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात मान्सून पूर्व आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. डुडी यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपवनंसरक्षक आदिती भारद्वाज जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्रकुमार जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी शशिकांत माळी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी देविदास ताम्हाणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भूस्खलन होण्याआधी निसर्गाकडून, पशु पक्षांकडून संकेत मिळातात. त्या संकेतांबाबतची दरड प्रवण गावांमध्ये जनजागृती करावी, असे निर्देश देवून जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, असे संकेत दिसल्यास तात्काळ तेथील नागरिकांना हलविण्यात यावे. पाटण, जावली, महाबळेश्वर व वाई या तालुक्यांवर विशेष लक्ष केंद्रीत करावे. सर्व नगरपरिषदांनी गटारे, नाले संपूर्ण स्वच्छ होतील हे पहावे. तसेच लगतच्या तलावातील गाळ काढण्यावर भर द्यावा.

आरोग्य विभागाने पावसाळ्यात उद्भवणारे साथींच्या रोगांबाबत पुरेसा औषधसाठा उपलब्ध करुन ठेवावा. साथींचा रोगाचा जास्त प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैद्यकीय अधिकारी आरोग्य केंद्रात पूर्णवेळ उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे. पाटबंधारे विभागाने नदीपात्रालगतची, नदीपात्रातील अतिक्रमणे हटवावित. धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यापूर्वी नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा द्यावा. कृषी विभागाने प्रत्येक मंडलामध्ये पर्जन्यमापक यंत्र बसल्याची खात्री करावी. ज्या ठिकाणी पर्जन्यमापक यंत्र बसले नाहीत त्या ठिकाणी पर्जन्यमापक प्राधान्याने बसवून घ्यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केल्या.

पुराचा संभाव्य धोका असणाऱ्या गावांना अन्नधान्याचा पुरेसा साठा उपलब्ध करुन द्यावा. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांवरील खड्डे बुजवून घ्यावे संभाव्य दरडप्रवण ठिकाणी आवश्यक साधन सामग्री उपलब्ध ठेवावी. प्रत्येक विभागाने नोडल ऑफीसरची नियुक्ती करुन अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक, नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांकांची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाला द्यावी. सर्व विभागांनी तालुकास्तरावर मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक घेऊन आपत्ती व्यवस्थापन आराखडा २० मे पर्यंत सादर करावा, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केल्या.

जिल्ह्यातील होर्डीग व बंधाऱ्यांचे स्ट्रक्चर ऑडीट करा

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील होर्डीग व पाटबंधारे विभागाने बांधलेल्या पाझर तलावांचे स्ट्रक्चरल ऑडीट करा. होर्डीगचे स्ट्रक्चरल ऑडट शहरी भागात नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी तर महामार्गावरील स्ट्रक्चर ऑडीट रस्ते विकास महामंडळाने करावे.

सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांनी घेतले क्षेत्र महाबळेश्वर मंदिरात दर्शन

- शुभम गुरव

क्षेत्र महाबळेश्वर

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्नी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांनी सोमवारी श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील श्री महाबळेश्वर मंदिरात दर्शन घेऊन देवाचा अभिषेक व पूजा केली.मंदिर व्यवस्थापनाच्या वतीने सौ सुनेत्रा पवार व पार्थ पवार यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी क्षेत्र महाबळेश्वरचे सरपंच सुनिल बिरामणे, संजय दिक्षित,नाना वाडेकर, राजेंद्र पुजारी, प्रदिप कात्रट, पंढरीनाथ लांगी आदी उपस्थित होते.

राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे कृषी विभागाचे उद्दिष्ट : डॉ. प्रवीण गेडाम

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : नैसर्गिक शेतीतील उत्पादने ही नागरिकांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असून राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे कृषी विभागाचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन राज्याचे कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.

कृषी व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक शेतीबाबत विज्ञान आणि नैसर्गिक शेती या विषयावरील यशदा येथे आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कृषी व शेतकरी विभाग भारत सरकार व एकात्मिक पोषण व्यवस्थापनच्या उपसचिव रचना कुमार, सहसचिव डॉ. योगीता राणा, आयसीएआरचे सहायक महासंचालक एस. के. शर्मा, डॉ. राजबीर सिंग, कृषी संचालक (आत्मा) दशरथ तांभाळे, पद्मश्री संजय पाटील, देशाच्या पश्चिम भागातील राज्यांचे कृषी सचिव, आयुक्त, संचालक, आयसीएआरचे शास्त्रज्ञ, शेतकरी आदी उपस्थित होते.

डॉ. गेडाम म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनअंतर्गत राज्यातील किमान २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. नैसर्गिक शेतीचे धोरण अंमलबजावणीकरीता लोकप्रतिनिधींचेही सहकार्य घेण्याचा प्रयत्न आहे. नैसर्गिक शेतीचे फायदे, पाण्याचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेतीतील उत्पादनाला बाजारपेठ याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडून देशात नैसर्गिक शेती करण्याविषयी धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत असून राज्यातही ते धोरण अवलंबिण्यात येत आहे. नैसर्गिक शेती संदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना मराठी भाषेत भाषांतर करण्यात येतील. परंपरागत कृषी विकास योजनेअंतर्गत नैसर्गिक शेतीकडे वळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

शेतकरी हा नैसर्गिक शेतीमागील मुख्य भागधारक असून तो आपल्या कुटुंबासाठी आणि उत्पन्नासाठी शेती करत असतो. रसायनांचा वापर न करता वनस्पती आणि प्राण्यांचे संवर्धन करण्यासाठी स्थानिक विविधतांवर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती करावी. महाराष्ट्रात सेंद्रिय कर्बयुक्त मातीचे प्रमाण खूपच कमी आहे. सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी शेतकऱ्याबरोबर कृषी विभागानेही प्रयत्न करावेत, असे सांगून राज्यातील जास्तीत जास्त क्षेत्र रसायनमुक्त आणि विज्ञानयुक्त अशा नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे असेही डॉ.गेडाम म्हणाले.

श्रीमती रचना कुमार म्हणाल्या, भारत सरकारचा कृषी व शेतकरी कल्याण विभाग नैसर्गिक शेतीबाबतचे धोरण आणि त्याअनुषंगाने परंपरागत कृषी विकास योजनेअंतर्गत कार्यक्रम सर्व राज्यात राबवित आहे. शेतकऱ्याला सेंद्रिय शेतीचे शास्त्रोक्त ज्ञान मिळायला हवे. नैसर्गिक शेती ही केवळ शेती नाही तर ते एक शास्त्रोक्त तत्त्वज्ञान आहे. याचा अवलंब करणे आवश्यक आहे.

रासायनिक शेतीचे दुष्परिणाम रोखण्यासाठी शास्त्रोक्त नैसर्गिक शेती का करावी याचे ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. या कार्यशाळेत देशातील विविध ठिकाणाहून आलेल्या अनुभवी व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळणार आहे. कार्यशाळेत भेटलेल्या ज्ञानाचा अवलंब करा, प्रत्यक्षात कृती करा असे सांगून नैसर्गिक शेतीला प्राध्यान्य देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यशाळेत श्रीमती राणा यांनी सादरीकरणाद्वारे नैसर्गिक शेतीची माहिती सांगितली.

या कार्यशाळेस राज्यातील चार कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, केंद्रीय कृषी मंत्रालयातील अधिकारी, महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळ, गोवा, दादरा आणि नगर हवेली आणि दमण व दिव आणि लक्षद्वीप या ८ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील शास्त्रज्ञ, अधिकारी आणि शेतकरी सहभागी झाले आहेत.

तामकडे स्मशानभूमी रस्त्याची दुर्दशा

ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

पाटण : तामकडे, ता. पाटण गावातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या वादग्रस्त ठरलेल्या रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. झाडा- झुडपातून वाट काढत ग्रामस्थांना ये-जा करावी लागत असल्याने ग्रामस्थ संताप व्यक्त करत आहेत. पावसाळ्यापूर्वी या रस्त्याचे काँक्रिटीकरण करावे, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा गावातील ग्रामस्थांनी दिला आहे.

तामकडे गावातील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता अतिशय दयनीय अवस्थेत असल्यामुळे अंत्ययात्रा घेऊन जाताना ग्रामस्थांना कसरत करावी लागत आहे. त्यातच पाऊस पडल्यामुळे घसरण होण्याची शक्यता आहे. अनेकदा अंत्ययात्रा घेऊन जात असताना या रस्त्यावरून ग्रामस्थ घसरून पडले आहेत.

मयत व्यक्तीचा शेवटचा प्रवास तरी सुखकर व्हावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

कराड-चिपळूण रस्त्याचे रुंदीकरण झाल्यानंतर कोयना नदीकडे जाणारा रस्ता बंद झाल्यामुळे संबंधित एल अँड टी कंपनीने रस्ता बनवून देतो, अशी हमी दिली होती. मात्र काम झाल्यानंतर कंपनीने गाशा गुंडाळला असून या रस्त्याकडे त्यांनी पाहिले देखील नाही. त्यानंतर लोकवर्गणीतून जेसीबीच्या सहाय्याने थोड्या प्रमाणात रस्ता ग्रामस्थांनी केला होता.

मात्र, मातीमुळे येथे घसरण झाली असून अवकाळी पावसामुळे रस्त्यावर चिखल झाला आहे. खराब रस्त्यामुळे स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी नेण्यात येणाऱ्या मृतदेहांची हेळसांड होत आहे. ढिम्म प्रशासन व बांधकाम विभाग, राजकीय पदाधिकारी या मागणीकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. तामकडे येथील स्मशान भूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे पावसाळ्यापूर्वी तातडीने काँक्रिटीकरण करण्यात यावे. रस्ता बंद झाल्याने नागरिकांची व वाहनधारकांची पंचाईत झाली आहे.

भावेश भिडेला २६ मे पर्यंत पोलीस कोठडी



मुंबई : बेकायदेशीर होर्डिंग लावणाऱ्या इगो कंपनीचा मालक भावेश प्रभुदास भिडे(वय ५२) याला२६ मे पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. मुंबई पोलिसांनी त्याला गुरुवारी उदयपूर येथून अटक केली होती.

घाटकोपर मधील छेडा नगर परिसरात सोमवारी सायंकाळी वादळी वारा व जोरदार पावसामुळे रस्त्याच्या बाजूला लावलेले सुमारे २५० टन वजनाचे जाहिरातीचे होर्डिंग लगतच्या पेट्रोल पंपावर कोसळल्यामुळे १६ जणांचा हकनाक बळी गेला तर ७६ जण जखमी झाले होते.

१२० बाय १२० चौरस मीटरचे होर्डिंग अनधिकृत रेल्वेच्या जागेत लावण्यात आले होते. इगो कंपनीचा मालक भावेश भिंडे याच्याविरोधात सदोष मनुष्य वध प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर तो मुंबईतून फरारी झाला होता. मात्र क्राइम ब्रांच पोलिसांनी मोबाईल फोनवरून लोकेशन वरून त्याचा पत्ता समजल्यानंतर त्याला अटक केली. २६ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. भावेश प्रभूदास भिंडे याच्यावर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असून त्याच्याविरोधात मुलुंड पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल असून पालिकेच्या परवानगीशिवाय फलक लावल्याप्रकरणी २१ वेळा कारवाई करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

आसनगाव : पश्चिम महाराष्ट्रात अग्रेसर असलेल्या व ५३ शाखाविस्तार करून सर्वांचा विश्वास संपादन केलेल्या पिंपोडे बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेच्या मुख्यालय इमारतीत व सर्व शाखा कार्यालयात संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, सल्लागार, अधिकारी, सेवक वर्ग यांचे हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सातारा,पुणे, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, सांगली, रत्नागिरी, कोल्हापूर व सोलापूर जिल्हे एवढे विस्तारित कार्यक्षेत्र असलेल्या आणि सीबीएस प्रणाली राबवून पारदर्शक व गतिमान करीत छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेने ३१ मार्च २०२४ अखेर ११६५ कोटी ४ लाख संमिश्र व्यवसाय करीत अडचणीतील १५ पतसंस्थांचे विलीनीकरण करून ठेवीदारांना दिलासा दिला आहे.

३४ वर्षांपूर्वी अवघ्या ४० हजाराचे भागभांडवलावर सुरू झालेल्या या संस्थेचा कारभार सक्षम बँकेप्रमाणेच सुरू असून स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचेवर निष्ठा ठेवून सहकाराचे माध्यमातून दुर्बलम त्रायते नित्यम या ध्येयधोरणांनुसार सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक गरजा भागविण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. संस्थेचे स्वतःचे मोबाईल ॲप मार्फत क्यू आर कोड व युपीआय कोड सुविधा उपलब्ध करून देणारी ग्रामीण भागातील ही एकमेव पतसंस्था असावी.

पिंपोडे बुद्रुक ता.कोरेगाव येथील संस्थेच्या मुख्यालय इमारतीत छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन व प्रतिमेस पुष्पहार घालून उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ.सोपानराव चव्हाण,व्हा. चेअरमन श्रीकांत शेटे, संचालक सुरेशबापू साळुंखे, अशोकराव लेंभे,रावसाहेब लेंभे,भरत साळुंखे, हणमंतराव निकम , कार्यकारी संचालक भावेश ढमाळ,सेवक वर्ग उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्थेच्या मुख्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन करताना संस्थापक रामभाऊ लेंभे, संचालक सुरेशबापू साळुंखे, अशोकराव लेंभे, रावसाहेब लेंभे व संचालक मंडळ, अधिकारी, सेवक वर्ग (छाया: शुभम गुरव)

दाढी दंडा विरोधात न्यायालयात धाव

मुंबई : काही वरिष्ठ अधिकारी मनमानी कारभाराचा इतका कळस गाठतात की, त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांना वैतागून शेवटी न्यायालयाची पायरी चढावी लागते. असाच प्रकार मुंबई महानगर पालिकेत घडला आहे.

दाढी केली नाही...भर दंड, बुटाची लेस सुटली..भर दंड, अपुऱ्या मनुष्यबळ अभावी डबल शिफ्ट करून नाईट शिफ्ट करताना डुलकी लागली तर ...भर दंड, सुरक्षा पॉईंटच्या ठिकाणी उपस्थित न राहणे...बुट फाटलेले या व इतर अनेक प्रकार मुंबई पालिकेतील मुख्य सुरक्षा अधिकारी अजित तावडे करत असल्याने सुरक्षा रक्षकांनी युनियन च्या मार्फत औद्योगिक न्यायालयात धाव घेतली आहे.

बेकायदेशीररित्या भरमसाठ दंड आकारण्यात येत असल्याच्या सुरक्षा रक्षकांच्या तक्रारीवरुन दि म्युनिसिपल युनियनने औद्योगिक न्यायालयात धाव घेतली आहे.

सद्या मुंबई महापालिकेत सुरक्षा रक्षकांवर भरमसाठ दंड आकारण्यात येत असल्याने तावडे यांच्या विरोधात सुरक्षा रक्षका मध्ये संतापाची लाट उसळली आहे.



३ ते ५ हजार रुपये दंड गेल्या वर्षभरापासून सुरक्षा रक्षकांना आकारण्यात येत असून सुरक्षा रक्षकांना आकारण्यात आलेला दंड हा बेकायदेशीर आहे, असे दि म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस रमाकांत बने यांनी सांगितले.

सुरक्षा रक्षकांना जो दंड आकारण्यात येत आहे, तो कोणत्या नियमावलीच्या आधारावर आहे. तसेच दंड आकारताना कोणत्याही प्रकारची चौकशी पूर्ण न करता कोणत्या निष्कर्षाच्या आधारावर भरमसाठ दंड आकारला जात आहे.

तर राज्यात वीज संकट ;कोराडीतील ६६० मेगावॅटचा संच बंद

वारंवार वीज निर्मिती संच बंद का?

महानिर्मितीच्या कोराडी केंद्रातील ६६० मेगावॅटचा संच क्रमांक ८ मध्ये बॉयलर ट्यूब लिकेज होऊन तो ४ मे रोजी बंद पडला होता. त्यानंतर पून्हा बॉयलर ट्यूब लिकेज होऊन हा संच पून्हा बंद पडला. दरम्यान निकृष्ठ कोळसा वापरल्या जात असल्याने हा तांत्रिक दोष वारंवार येत असल्याची लोकसत्ताकडे तक्रार आली आहे. या विषयावर महानिर्मितीच्या संबंधित अधिकाऱ्यांना तीन दिवसांपासून वारंवार विचारना केल्यावरही त्यावर प्रतिसाद मिळाला नाही.

नागपूर: राज्यातील काही भागात उकाडा वाढला असतांनाच दुसरीकडे महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पातील ६६० मेगावॅटचा संच क्रमांक ८ तांत्रिक कारणाने (१४ मे) पासून बंद पडला आहे. राज्यात विजेची मागणी अचानक वाढल्यास वीज पुरवठ्यावर परिणामाची शक्यता आहे.

राज्यातील काही भागात अवकाळी पाऊस पडत असून काही भागात चांगलेच उन्ह तापत आहे. अवकाळी पाऊस पडणाऱ्या भागातही दुपारी चांगलाच उन्ह पडत असून रात्री अधून- मधून पाऊस पडतो. उकाड्यामुळे राज्यात सर्वत्र पंखे, वातानुकुलीत यंत्रासह विद्युत उपकरणांचा वापर वाढला. दरम्यान राज्यात अधून- मधून अचानक विजेची मागणी वाढताना दिसत आहे.

दरम्यान महानिर्मितीच्या नागपुरातील कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्पातील कोराडीतील ६६० मेगावॅटचा संच क्रमांक ८ बॉयलर ट्यूब लिकेजमुळे १४ मे रोजी बंद पडला. संच बंद पडल्याने येथील वीज निर्मिती सुमारे ६०० मेगावॅटने कमी झाली. त्यामुळे रोजच्या १ हजार ९०० मेगावॅट ऐवजी सध्या येथे १ हजार ३१२ मेगावॅटच वीज निर्मिती होत आहे. संच दुरूस्तीला आणखी काही दिवस लागणार आहेत. दरम्यान राज्यात शुक्रवारी (१७ मे) विजेची मागणी सुमारे २७ हजार मेगावॅटच्या जवळपास होती. त्यापैकी २३ हजार ७०० हजार मेगावॅटची मागणी फक्त महावितरणची होती. मुंबईचीही मागणी ४ हजार मेगावॅटच्या जवळपास होती. दोन दिवसांत हा संच सुरू होणार असल्याचा दावा महानिर्मितीच्या जनसंपर्क विभागाने केला आहे. तर महावितरणच्या जनसंपर्क विभागाने सध्या मागणी कमी असून आवश्यक वीज उपलब्ध असल्याचे सांगितले.

सर्वाधिक वीज निर्मिती महानिर्मितीकडून

राज्यात शुक्रवारी दुपारी ३ वा. सर्वाधिक ८ हजार ४२९ मेगावॅट वीज निर्मिती महानिर्मितीकडून होत होती. त्यात औष्णिक विद्युत प्रकल्पांतून ७ हजार ४०७ मेगावॅट, उरन गॅस प्रकल्पातून १३० मे. वॉ., कोयना जलविद्युत प्रकल्पातून ८३९ मे. वॉ., सौरऊर्जा प्रकल्पातून ७५ मे. वॉ.चा समावेश होता. खासगी प्रकल्पांपैकी अदानीकडून २ हजार १८५ मे. वॉ., जिंदलकडून १ हजार ८८ मे. वॉ., आयडियलकडून २३२ मे. वॉ., रतन इंडियाकडून १ हजार ७४ मे. वॉ., एसडब्लूपीजीएलकडून ४९१ मे. वॉ. वीज निर्मित होत होती. केंद्राच्या वाट्यातून राज्याला ९ हजार ३२३ मेगावॅट वीज मिळत होती.

भोर तालुक्यात आवकाळीचा तडाखा

आंबा, कांदा पिकाचे नुकसान

भोर : भोर तालुक्यात मागील आठ ते दहा दिवसांपासून दिवसाआड ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट तर वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस बरसत असल्याने शेती काम खोळंबली असून आंबा, कांदा व बागायत पिकांचे नुकसान झाले आहे. तर बहुतांशी ठिकाणी वीज, झाडे तसेच घराच्या भिंती कोसळण्याचे प्रकार सुरू असल्याने शेतकरी अवकाळीच्या धास्तीने हवालदिल झाला आहे.

सध्या उन्हाळा संपत आल्याने शेतकरी खरीप हंगामातील शेती मशागतीच्या कामांची लगबग करीत असतानाच वारंवार १५ दिवसांपासून अवकाळी बरसत असल्याने शेतातील काम करणे शेतकऱ्यांना कठीण होत आहे. शेतीची मशागत होऊन पाऊस झाला तर तो पिकांसाठी उपयुक्त ठरतो.मात्र शेती मशागती होण्याअगोदरच तालुक्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडत असल्याने सध्या बरसत असलेल्या पावसाचा शेतीसाठी काही उपयोग होत नाही. तालुक्यात रस्त्यावर,शेतात झाड कोसळणे तसेच कोसळण्याचे दोन तीन प्रकार घडल्याने अवकाळी पावसाचे वातावरण तयार झाल्यावर शेतकरी शेती काम करण्यासाठी शेतात जाण्यास धजावत नसल्याचे चित्र आहे. गुरुवार (दि.१६) भोर तालुक्याच्या ग्रामीण भागासह शहरात जोरदार पण शांततेत अवकाळी बरसला.तालुक्यात कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नसल्याचे चित्र आहे.

जनावरांसाठी हिरव्या चारा उगवला..

पंधरा दिवसांपासून तालुक्यात सर्वत्र अवकाळी पाऊस बरसत असल्याने माळरानांवर तसेच शेताच्या बांधांना चांगलाच हिरवा चारा फुटल्याने जनावरांना ऐन उन्हाळ्यातही काहीशा प्रमाणात हिरवा चारा मिळणार आहे. तर या पावसामुळे वातावरणात ही गारवा निर्माण झाला आहे असे खानापूर येथील शेतकरी चंद्रकांत नांगरे यांनी सांगितले.

उन्हाळा की पावसाळा तेच कळेना...

तालुक्यात पंधरा दिवसांपासून पावसाळा ऋतू सुरू झाल्यागत पावसाचे वातावरण दररोज सायंकाळी तयार होत असून दिवसाआड अवकाळी पाऊस बरसत आहे. पावसाचा सध्या तरी काहीच उपयोग होत नसल्याने तर उन्हाळा जाणवतच नसल्याने मे महिना उन्हाळा की पावसाळ्याचा तेच कळेना असे दै.नवराष्ट्रशी बोलताना तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सांगितले.

मुक्त विद्यापीठाच्या २४ मेपासून परीक्षा

नाशिक : येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या २०२३-२४ या वर्षातील उन्हाळी सत्र लेखी परीक्षा २४ मे ते १२ जून या कालावधीत विद्यापीठाच्या ६०१ केंद्रांवर होणार आहेत.

विद्यापीठाच्या अभ्यास केंद्रावर प्रवेश घेतलेले सुमारे चार लाख ८९ हजार ६६० विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षा सुरळीत होण्यासाठी विद्यापीठामार्फत विविध भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षा आयोजनाच्या सर्व मार्गदर्शन सूचना विभागीय केंद्रांमार्फत अभ्यास केंद्रांना देण्यात आल्या असून विद्यार्थ्यांसाठी मदत यंत्रणाही कार्यरत करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले असून, विद्यार्थ्यांनी ते पोर्टलवरून डाऊनलोड करून घ्यावे, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

गोडसाखर’ पुन्हा भाडेतत्त्वावर राजकीय संघर्ष बळावला

गडहिंग्लज : आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना (गोडसाखर) पुन्हा एकदा चालवायला देण्याचे संकेत आहेत. शनिवारी (ता. १८) बोलविलेल्या संचालक मंडळ बैठकीच्या या विषयावर चर्चा होणार आहे. आठ वर्षे खाजगी व्यवस्थापन द्वारे हा कारखाना चालविला होता आता पुन्हा सहकारातील गोड साखरची खाजगीकरण कडे वाटचाल सुरू झाली आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेने ७५ कोटींचे आर्थिक पाठबळ देऊनही अचानक कारखाना चालवायला देण्याचा विषय पुढे आल्याने तालुक्यात आश्चर्य व्यक्त होत आहे.

कारखाना आर्थिक अडचणीत आल्याने २०१३ पासून ब्रिस्क कंपनीकडे भाडेतत्त्वाने चालविण्यासाठी दिला. दहा वर्षांची मुदत असताना आठ हंगाम पूर्ण करून कंपनीने कारखाना सोडला. त्यानंतर तत्कालीन संचालक मंडळाने २०२१-२२ चा हंगाम सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केली.

आज शनिवारी (ता. १८) दुपारी तीन वाजता कारखाना सभागृहात होणाऱ्या संचालक मंडळाच्या बैठकीसमोर दोन विषयांची नोटीस सचिवांच्या सहीने काढली आहे. कारखाना चालवण्यास देणे व अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे असे दोनच विषय आहेत. यातील कारखाना चालवण्यास देण्याचाच मुद्दा प्रामुख्याने चर्चेला येणार आहे. त्यावर कोणता निर्णय होणार, याकडे आता तालुक्यातील ऊस उत्पादकांचे लक्ष आहे.

अर्थसाहाय्य उपलब्धतेसाठी सुरू केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले. अखेर तत्कालीन अध्यक्ष कै. श्रीपतराव शिंदे व त्यांच्या समर्थक संचालकांनी तालुक्यातून विविध संस्था व वैयक्तिक ठेव गोळा करून कारखाना स्वबळावर सुरूही केला. दरम्यान, अंतर्गत वादामुळे १२ संचालकांनी राजीनामा दिल्याने संपूर्ण संचालक मंडळ बरखास्त झाले.

दरम्यान, प्रशासकांनी कारखाना चालविण्यास देण्याची दोनवेळा निविदा प्रसिद्ध केली. परंतु, त्यासाठी कोणतीच कंपनी पुढे आली नाही. त्यानंतर झालेल्या कारखान्याच्या निवडणुकीत सत्तांतर झाले. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखालील आघाडीने सत्ता मिळविली. डॉ. प्रकाश शहापूरकर अध्यक्ष झाले. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केडीसीसीच्या माध्यमातून कारखान्याला पहिल्या टप्यात ५५ कोटींचे अर्थसहाय्य दिले. मशिनरी दुरुस्तीसाठी मोठा अवधी लागल्याने कारखान्याचा २०२३-२४ चा हंगाम उशिरा का होईना स्वबळावर सुरू झाला.

कारखाना चालविण्याचे सभासदांना दिलेले आश्वासन पूर्ण झाले. हंगामाच्या अंतिम टप्प्यात उत्पादकांना तोडणी- ओढणीची बिले देण्यासाठी केडीसीने २० कोटींचे अर्थसहाय्य आणि त्यानंतर अध्यक्ष डॉ. शहापूरकर पानी एका ट्रस्टकडून ३०० कोटींचे अर्थसहाय्य घेण्याचा विषय संचालकां बैठकीत आणला. त्याला एकमत मंजुरीही मिळाली. दरम्यान, केडीसीसीने मोठे पाठबळ देऊनही पुन्हा गोड साखरची वाटचाल खासगीकरणाच्या दिशेने सुरू झाली आहे.

पाच कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार दाखल

शिरोली : स्क्रॅप व्यवसायात पाच कोटी चाळीस लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. भावेश्वरी इंडस्ट्रीजचे विनायक सुकुमार लाड यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून रचना ॲग्रो सर्व्हिसेसचे कल्पेश बाळासो कुंभार व पीपी ट्रेडर्सचे पांडूरंग मारुती कुंभार यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०२१ ते मार्च २०२३ या कालावधीत ही फसवणूक झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी , विनायक लाड यांच्या वडिलांचा भावेश्वरी इंडस्ट्रीज या नावाने स्क्रॅप व्यवसाय होता. २०२३ मध्ये विनायकच्या वडिलांचा मृत्यू झाल्याने सद्या हा व्यवसाय बंद आहे. पण २०२१ मध्ये विनायक लाड यांनी भावेश्वरी इंडस्ट्रीजच्या नावाने रचना ॲग्रो सर्व्हिसेसला मोठ्या प्रमाणात स्क्रॅप विक्री केली. यामध्ये सीआय बोरिंग व एम एस स्क्रॅपचा समावेश होता. सुरवातीचे काही व्यवहार अतिशय चांगले झाले. रचना ॲग्रो सर्व्हिसेसचे कल्पेश बाळासो कुंभार यांनी आर्थिक व्यवहारही ठरलेल्या वेळेत पूर्ण केले. त्यामुळे भावेश्वरी इंडस्ट्रीज व रचना ॲग्रो सर्व्हिसेस यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण झाले. नेमका याचाच गैरफायदा घेत कल्पेश कुंभार यांनी पीपी ट्रेडर्सचे पांडूरंग मारुती कुंभार यांना विनायक लाड यांच्या संपर्कात आणले. आणि नंतरच्या काळात रचना ॲग्रो सर्व्हिसेस व पीपी ट्रेडर्सचे उधारीवर मालाची मोठ्या प्रमाऊ खरेदी सुरू केली. उधारीवर मालाची देवाण - घेवाण करताना स्टॅम्पवर स्वाक्षरी करत कल्पेश कुंभार व पांडूरंग कुंभार यांनी विनायक लाड यांना थकीत रक्कम परत देण्याबाबत विश्वास व्यक्त केला.

दरम्यानच्या काळात भावेश्वरी इंडस्ट्रीजने पाच कोटी चाळीस लाख पंच्याऐंशी हजार रुपयांचा माल रचना ॲग्रो व पीपी ट्रेडर्सला विकला होता. उधारीची रक्कम मोठी झाल्याने कल्पेश कुंभार व पांडुरंग कुंभार यांनी लाड यांना रक्कम परत करण्यासाठी टाळाटाळ केली.

खोटी आश्वासने देऊन कुंभार आपल्याला फसवत असल्याचे लाड यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या आदेशाने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हा अन्वेशनच्या सपोनि श्रीमती लायकर करीत आहेत.

नव्या पिढीला विचारांचा वारसा देण्याची गरज : डॉ. मेघा पानसरे

तीन दिवसीय श्रमिक प्रतिष्ठान शिबिराची सुरवात

राजदंड न्युज नेटवर्क

पन्हाळा : तंत्रज्ञानातील बदलामुळे विचारांची देवाणघेवाण थांबली आहे देश विकसित होत असताना राजकारण्यांमुळे व धार्मिक कारणांमुळे देश सध्य स्थितीत निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे त्याचे चिंतन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन डॉ.मेघा पानसरे यांनी व्यक्त केले त्या श्रमिक प्रतिष्ठान आयोजित महाराष्ट्र इतिहास प्रबोधीनीचे कॉम्रेड गोविंद पानसरे युवा जागर २०२४ तर्फे मी आणि माझा भारत काल-आज-उद्या या तीन दिवसीय निवासी शिबिराच्या सुरुवातीला बोलत होत्या शिबिर संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.

श्रमिक प्रतिष्ठान आयोजित शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ.मेघा पानसरे व्यासपीठावर प्रा. नंदकुमार मोरे, प्रा.अवनिश पाटील,डॉ. मंजुश्री पवार

त्या पुढे म्हणाल्या की, भारत देशातील महाराष्ट्राचा जरी विचार केला तरी येथील समाजालाअपेक्षित देशाची प्रगती झाली का याचा विचार पडतो नवे तंत्रज्ञान आले असले तरी ते समाजाच्या कल्याणासाठी घेतलेले निर्णय योग्य आहेत का याचा कितपत उपयोग होतो याचा कोणताच विचार होत नाही आणि म्हणूनच या शिबिरात आपण सर्वांनी मिळून कॉम्रेड. पानसरेंच्या विचारांचा जागर करुन येथुन नवा संदेश घेवुया

शिबिरातील पहिल्या सत्रात डॉ. मंजुश्री पवार यांनी भारत वर्षातील ईतिहासाचा व्यापक आढावा घेतला तर दुसऱ्या सत्रात संस्कृती व पर्यावरण अभ्यासक व लेखक दत्ता देसाई यांचे भारताची कल्पना आणी माझ्या स्वप्नातील भारत या विषयावर उत्कट प्रबोधनात्मक विचार मांडले गेले

तीन दिवस चालणाऱ्या या शिबिरात शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाचे प्रमुख प्रा. नंदकुमार मोरे, शिवाजी विद्यापीठ ईतिहास विभागाचे प्रमुख प्रा.अवनिश पाटील, शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा प्रमुख डॉ. मेघा पानसरे व ईतिहास विभागाच्या डॉ.मंजुश्री पवार यांचे मार्गदर्शन होणार आहे शिबिरासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसह गोवा, पश्चिम बंगाल, केरळ, आंध्रप्रदेश येथील सुमारे दोनशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

विधानपरिषद शिक्षक, पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका पुढे ढकलल्या

रेल्वे स्थानक प्रशासनाची माहिति

मुंबई : महाराष्ट्रात सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. या निवडणुकीदरम्यान निवडणूक आयोगाकडून विधान परिषदेच्या २ शिक्षक आणि २ पदवीधर मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली होती. या निवडणुकीसाठी दि १० जूनला मतदान होणार होतं. पण १० जूनला अनेक शाळा आणि शिक्षकांना सुट्टी आहे. त्यामुळे मतदानावर त्याचा परिणाम पडू शकतो, असा शिक्षक संघटनांचा दावा होता. त्यामुळे ही निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात आली होती. निवडणूक आयोगाने शिक्षक संघटनांची ही मागणी मान्य करीत शिक्षक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या आहेत.

मुंबई पदवीधर मतदारसंघावर सध्या विलास पोतनीस हे विद्यमान आमदार आहेत. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघावर निरंजन डावखरे हे विद्यमान आमदार आहेत. नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघावर किशोरे दराडे हे विद्यमान आमदार आहेत. तर मुंबई शिक्षक मतदारसंघात कपिल पाटील हे विद्यमान आमदार आहेत. या सर्व आमदारांचा विधान परिषदेचा कार्यकाळ हा येत्या ७ जुलै २०२४ ला संपणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाकडून या चार जागांसाठी निवडणूक घोषित करण्यात आली.

दरम्यान, शाळा १५ जून रोजी सुरू होत असल्याने अनेक शिक्षक गावी जाणार आहेत त्यामुळे शिक्षक व पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीच्या मतदानावर परिणाम होणार असल्याने निवडणूक आयोगाने निवडणूक पुढे ढकलावी अशी मागणी शिक्षक संघटना व राजकीय पक्षांकडून निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती.

डेंग्यूला दूर हटविण्यासाठी परिसरात डासांची उत्पत्ती रोखा : आरोग्य विभागाचे आवाहन

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : डेंग्यू आजाराला प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी साठवलेल्या पाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करावे, डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे निमार्ण होऊ देऊ नये तसेच आवश्यक दक्षता बाळगावी, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाने १६ मे रोजी पाळण्यात येणाऱ्या राष्ट्रीय डेंग्यू दिनाच्यानिमित्ताने केले आहे.

डेंग्यू आजाराचा प्रसार हा एडिस इजिप्ती या डासाच्या चावण्यापासून होतो. या डासाची उत्पत्ती साठवणूक केलेल्या स्वच्छ पाण्यात होते. नागरिकांनी आपल्या घरातील पाणी साठवणूकीचे भांडे आठवड्यातून एकदा रिकामे व कोरडे करुन भरावे. एक दिवस कोरडा पाळण्यात यावा. आपल्या घराच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी.

डेंग्यूचे रूग्ण नियमित स्वरूपात आढळत असून डेंग्यू आजाराच्या संख्येत ऑगस्ट, सप्टेंबर नंतर वाढ होताना दिसते. काही भागात अतिपाऊस, वाढते शहरीकरण, स्थलांतराचे प्रश्न, विविध विकासकामे अशा अनेक कारणांमुळे डेंग्यू आजाराचे प्रमाण वाढते.

आमदार रवींद्र धंगेकर यांच्यासह कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : रवींद्र धंगेकर यांनी रविवारी सहकारनगर पोलीस स्टेशनसमोर आंदोलन केले होते. धंगेकर यांनी भाजपकडून पैसे वाटप होत असल्याचा आरोप केला होता. या आंदोलनामुळे धंगेकर अडचणीत सापडले असून रवींद्र धंगेकर यांच्यासह कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहीतेचा भंग करून बेकायदेशीर जमाव जमवुन व घोषणा देवुन आंदोलन केल्याप्रकरणी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यासह ४० ते ५० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम १४३, १४५, १४९, १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ व लोकप्रतिनीधी अधिनियम १९५१ चे कलम १२६ प्रमाणे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जोपर्यंत पोलीस पैसे वाटप करणाऱ्यांवर कारवाई करत नाहीत, तोपर्यंत पोलीस ठाण्यातून उठणार नाही असा आक्रमक पवित्रा आमदार धंगेकर यांनी रविवारी घेतला होता.

देशातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी

कोल्हापूर : देशातील जनता पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार निवडून देईल, असा विश्वास आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि तेलगू देसम पार्टीचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केला. आज कोल्हापुरात त्यांनी करवीर निवासिनी आई अंबाबाईचं दर्शन घेतलं, यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.



करवीर निवासिनी आई अंबाबाईचं मंदिर साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असून देशातील प्रार्थना स्थळांपैकी एक महत्त्वाचं मंदिर आहे. आज करवीर निवासिनी आई अंबाबाई चरणी नतमस्तक झालो आणि देशातील जनतेची सेवा करण्यासाठी आशीर्वाद मागितले. नक्कीच मला विश्वास आहे, करवीर निवासिनी आई महालक्ष्मी आम्हा सर्वांना आशीर्वाद देईल, असा विश्वास यावेळी माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केला. सकाळी साडे अकराच्या सुमारास हैदराबादहून विमानानं चंद्राबाबू नायडू कोल्हापुरात दाखल झाले. यानंतर त्यांनी अंबाबाईचं दर्शन घेतलं. यावेळी सुमारे अर्धातास नायडू कुटुंबांनी मंदिरात पूजा आणि आरती केली, यानंतर ते शिर्डीसाठी रवाना झाले.

लोकसभा निवडणुकीतील चौथ्या टप्प्याचं मतदान २० मे ला होत आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत देशातील वातावरण हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाजूनं सकारात्मक आहे. आंध्रप्रदेशसह देशभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सकारात्मक लाट निर्माण झाली. त्यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडी देशात ४०० लोकसभा जागा जिंकेल, असा विश्वास तेलगू देसम पक्षाचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केला.

आंध्रप्रदेश, गोवा आणि राज्यातील अनेक भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या करवीर निवासिनी आई अंबाबाई मंदिरात रोजच देशभरातून भाविक दर्शनासाठी येतात. आज आंध्रप्रदेशातील भाविक ही दाखल झाले. यावेळी चंद्राबाबू नायडू मंदिरातून बाहेर पडताना भक्तांनी ’जय बाबु’ च्या घोषणा दिल्या. माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी थांबून घोषणा देणाऱ्या जनतेचं अभिवादन स्वीकारले.

आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू कोल्हापुरात येणार असल्यानं बुधवारी कोल्हापूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीनं सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला.

आज चंद्राबाबू नायडू यांचा ताफा जाणाऱ्या मार्गावर कोल्हापूर पोलीस दलाच्या वतीनं चोख बंदोबस्त ठेवण्यात आला. मंदिर परिसरातील दुकानंही काही काळ बंद ठेवण्यात आली. यामुळे मंदिर परिसराला पोलीस छावणीचं स्वरूप प्राप्त झाले. यावेळी देवस्थान समितीचे व्यवस्थापक महादेव दिंडी यांनी स्वागत केले.